जाहीर सूचना

जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की आमच्या अशील श्री. चंदन सिंग, राहणार येथे बी२-२७, ओएनजीसी कॉलनी, जेव्हीपीडी, गुलमोहर रोड, विलेपार्ले पश्चिम, मुंबई ४०० ०४९ या मौल्यवान मोबदल्याकरिता येथील श्री. भगवान कोंडु शिने, सौ. शांताबाई नाथु लोखंडे, सौ. हौसाबाई बबन भांगरे यांच्याकडून गाव वाळवंटी, तालुका मावळ, जिल्हा पुणे चा गट क्र.६, मोज.००.७५.४० एच.आर.पी व गट क्र.११४, मोज.०२.६६.०१ एच.आर.पी धारक जमिन खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

जर कोणाही व्यक्तीस सदर जमिनीच्या प्लॉटवरील कोणतेही दावे, आक्षेप हक्क, अधिकार, हितसंबंध, प्रभार वा गहाण असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १४ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांना संपर्क साधावा कसूर केल्यास आमचे अशील सदर जमिनीचा प्लॉट हा सर्व भारांपासून मुक्त आहे असे समजून विक्री प्रक्रिया पूर्ण करतील आणि कोणतेही दावे वा आक्षेप सदर कालावधीच्या समाप्तीनंतर प्राप्त झाल्यास दावे वा आक्षेप त्यानंतर गृहित धरले जाणार नाहीत.

सदर दिनांक २७ फेब्रुवारी, २०२२

व्यास अँन्ड भालवाल,
वकील व सॉलिसीटर्स,
खरेदीदारांचे वकील
२१८/२२०, २ रा मजला,
वर्धमान चेंबर, कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. क्र. २२०४०८६२/२२८८१२६९.

जाहीर नोटीस

मा.महानगर दंडाधिकारी,13 वे न्यायालय दादर,
मुंबई यांच्या न्यायालयात केस क्र.१६२/Misc/२०२२
श्री संतोष पांडुरंग पिसाळ (अर्जदार)..
विरुद्ध
निंबधक (जन्म- मृत्यू नोंदणी विभाग)
G/South Ward, मुंबई महानगरपालिका,मुंबई.13

या सर्व जनतेस कळविण्यात येते की,अर्जदार **श्री.संतोष पांडुरंग पिसाळ** (अर्जदार),धंदा .. राहणार ४/४३ वाणी चाळ ना. म.जोशी मार्ग पोदार मिल,जेकब सर्कल मुंबई त्याचे आई नामे **शकुंतला पांडुरंग पिसाळ** यांचे निधन दिनांक १३.१०.२०१९ रोजी त्यांच्या राहत्या निवासस्थानी म्हणजेच रूम न २८, दुसरा माळा शिवराज भवन नं ०१ बी.एम.मार्ग एल्फिन्स्टन मुंबई-१३. येथे झाले आहे पण त्यांच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदार महानगरपालिका बृहन्मुंबई मार्फत वैद्यकिय अधिकारी,जी/साऊथ वार्ड मुंबई यांच्याकडे करण्यात आलेली नाही.त्यामुळे अर्जदार या न्यायालयात अर्ज क्रं १६२/MISC/२०२२ दाखल करून त्यांचे आईची मृत्यूची नोंद गैरअर्जदार कार्यालयात करण्याबाबत गैरअर्जदार यांना आदेशित करावे, अशी विनंती केली आहे. तरी या द्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की,जर अर्जदाराच्या मृत्यूच्या नोंदीबाबत ज्यांना कोणला आक्षेप असेल त्यांनी ही जाहीर नोटीस प्रकाशित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा स्वतःच्या वकिलामार्फत या न्यायालयात हजर होऊन त्यांचे आक्षेप अथवा उत्तर अथवा म्हणणे दाखल करावे.जर विहित मुदतीत कोणाचीही काहीही आक्षेप नाही असे समजून पुढील आदेश पारित करण्यात येतील,याची नोंद घ्यावी. आदेशावरून

दिनांक : २१/०२/२०२२ — न्यायलिपीक, : महानगर दंडाधकारी, १३ वें न्यायालय,दादर,मुंबई.

जाहीर नोटीस

मा.महानगर दंडाधिकारी,13 वे न्यायालय दादर,
मुंबई यांच्या न्यायालयात केस क्र.१६१/Misc/२०२२
श्री संतोष पांडुरंग पिसाळ (अर्जदार)..
विरुद्ध
निंबधक (जन्म- मृत्यू नोंदणी विभाग)
G/South Ward, मुंबई महानगरपालिका,मुंबई.13

सर्व जनतेस कळविण्यात येते की,अर्जदार **श्री.संतोष पांडुरंग पिसाळ** (अर्जदार),धंदा .. राहणार ४/४३ वाणी चाळ ना. म.जोशी मार्ग पोदार मिल,जेकब सर्कल मुंबई त्याचे वडील नामे **पांडुरंग गणपत पिसाळ** यांचे निधन दिनांक ०५.१०.२०१९ रोजी त्यांच्या राहत्या निवासस्थानी म्हणजेच रूम नं.२८, दुसरा माळा शिवराज भवन नं ०१ बी.एम.मार्ग एल्फिन्स्टन मुंबई-१३. येथे झाले आहे पण त्यांच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदार महानगरपालिका बृहन्मुंबई मार्फत वैद्यकिय अधिकारी,जी/साऊथ वार्ड मुंबई यांच्याकडे करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदार या न्यायालयात अर्ज क्रं १६१/MISC/२०२२ दाखल करून त्यांचे वडिलांचे मृत्यूची नोंद गैरअर्जदार कार्यालयात करण्याबाबत गैरअर्जदार यांना आदेशित करावे, अशी विनंती केली आहे. तरी या द्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की,जर अर्जदाराच्या मृत्यूच्या नोंदीबाबत ज्यांना कोणला आक्षेप असेल त्यांनी ही जाहीर नोटीस प्रकाशित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा स्वतःच्या वकिलामार्फत या न्यायालयात हजर होऊन त्यांचे आक्षेप अथवा उत्तर अथवा म्हणणे दाखल करावे. जर विहित मुदतीत कोणाचीही काहीही आक्षेप नाही असे समजून पुढील आदेश पारित करण्यात येतील,याची नोंद घ्यावी. आदेशावरून

दिनांक : २१/०२/२०२२ — न्यायलिपीक, : महानगर दंडाधकारी, १३ वें न्यायालय,दादर,मुंबई.

सिटी युनियन बँक लिमिटेड

CUB TRUST AND EXCELLENCE SINCE 1904

क्रेडीट रिकव्हरी ॲण्ड मॅनेजमेंट डिपार्टमेंट
प्रशासकीय कार्यालय : क्र. २४-बी, गांधी नगर, कुंबकोणम-६१२ ००१, **ईमेल आयडी :** crmd@cityunionbank.in
फोन : ०४३५-२४३२३२२, **फॅक्स :** ०४३५-२४३१७४६

सरफैसी ॲक्ट २००२ अन्वये पुनर्निविदा-नि-लिलाव विक्री सूचना

खालील मिळकत/ती या **सिटी युनियन बँक लिमिटेड** कडे गहाण आहेत त्या कर्जदार/हमीदार **क्र. १) मे. शिवानंद डेव्हलपर्स, येथे उषा चंद्रसेन जाधव चाळ, शास्त्री नगर, तिसगम, कल्याण (पूर्व), जि. ठाणे. क्र. २) श्री. गोपाल एस. झा, सुरेंद्र झा यांचा मुलगा, येथे फ्लॅट क्र. ००१, कृष्ण कुंज अपार्टमेंट, कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे. क्र. ३) सौ. अनिता झा, गोपाल एस. झा यांची पत्नी, येथे फ्लॅट क्र. ००१, कृष्ण कुंज अपार्टमेंट, कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे** यांचेकडून **१९-१२-२०२१** रोजीस **रु. १७,०४,३५३/- (रुपये सतरा लाख चार हजार तीनशे त्रेपन्न मात्र)** सह एकत्रित **२०-१२-२०२१** पासून ते प्रभारीत होणारे पुढील व्याज आणि इतर खर्च, बँकेकडे इतर थकबाकीच्या वसुलीकरिता सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) व ९ अंतर्गत बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे निविदा-नि-जाहीर लिलावाने विकण्यात येणार आहे.

टीप: आमची **२७०-मुंबई-कल्याण शाखा**ने प्रोप्रायटर म्हणून तुम्ही क्र. २ द्वारे सादरीकरण तुम्ही क्र. १ द्वारा केलेल्या विनंतीनुसार वित्तीय सहाय्य **३१.१२.२०२०** दिनांकीत (एफआयटीएल-एडीएचओसी: ५०१९१२०९००१४९६५) वाढवले आहे आणि **१३%** चे आरओआय रु. **९६,०००/-** एकूण रमकेरीता तुम्ही क्र. २ आणि ३ सह-कर्जदार म्हणून आहात आणि **३१.०३.२०२१** रोजी **एनपीए** म्हणून वर्गीकृत करण्यात आले आणि **१९-१२-२०२१** रोजीसची एकूण थकबाकी ही **रु. १,१०,३९५/-** अधिक पुढील व्याज आणि प्रदानाच्या तारखेपर्यंतचे **२०-१२-२०२१** पासून प्रभारीत मासिक आधारे **२.००%** दराने दंडात्मक व्याज.

आमच्या बँकेकडे गहाण असलेली स्थावर मिळकत

परिशिष्ट-ए: (श्री. गोपाल एस. झा, सुरेंद्र झा यांचा मुलगा यांच्या मालकीची मिळकत)

आदिवाली ढोकली ग्रामपंचायतच्या हद्दीमधील आणि नोंदणीकृत उप-जिल्हा उल्हासनगर व जिल्हा ठाणे मधील आणि सव्हें क्र. ३९, हिस्सा क्र. ३सी, गाव आदिवली ढोकली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या आणि असलेल्या कल्याण जिल्हा, ठाणे येथील कृष्णकुंज अपार्टमेंट अशा ज्ञात बिल्डिंगीमधील बी-विंग मधील तळमजल्यावरील फ्लॅट क्र. ००१, मोजमापित ३५५.०० चौ.फूट बिल्टअप क्षेत्र. सिमाबद्धः पूर्वः खचरू भाने यांची मिळकत, पश्चिम: बाबुराम पवार यांची मिळकत, उत्तर: केशव भाने यांची मिळकत, दक्षिण: बाळाराम भाने यांची मिळकत.

राखीव किंमत : रु. १२,००,०००/-
(रुपये बारा लाख मात्र)

पुन-लिलावाचा तपशील

निविदा नि लिलाव विक्रीची तारीख	ठिकाण
१८-०३-२०२२	**सिटी युनियन बँक लिमिटेड, मुंबई-कल्याण शाखा,** १-ई, रामकृष्ण नगर, मुरबाड रोड, कल्याण पश्चिम, मुंबई, ठाणे-४२१३०४. दूरध्वनी क्र. ०२५१-२२०३२२२, मोबा.क्र. ९३२५०५४२५२.

निविदा-नि-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती :

(१) इच्छुक बोलीदाराने लिलावाकरिता व्यक्तिशः हजर राहणे आणि व्यक्तिशः सहभागी होणे आणि तो/ती त्याच्या/तिच्याकरिता बोली करीत असल्याची लेखी घोषणा करणे आवश्यक आहे. **(२)** इच्छुक बोलीदार **व्यवस्थापक, सिटी युनियन बँक लिमिटेड, मुंबई- कल्याण शाखा, १-ई, रामकृष्ण नगर, मुरबाड रोड, कल्याण पश्चिम, मुंबई, ठाणे-४२१३०४** यांचेकडून निविदा प्रपत्र प्राप्त करू शकतात. **(३)** इच्छुक बोलीदाराने याद्वारे अधिसूचित केल्यानुसार निविदा-नि-लिलाव विक्रीच्या तारखेस **दु. १२.०० वा. किंवा पूर्वी ''सिटी युनियन बँक लि.''** च्या नावे काढलेल्या राखीव किंमतीच्या **१०%** च्या इअरकरिता पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्टसह एकत्रित **प्राधिकृत अधिकारी, सिटी युनियन बँक लि.** यांच्या नावे मोहोरबंद लिफाफ्यातूनच फक्त विहित निविदा प्रपत्रातून त्यांच्या बोली सादर करणे आवश्यक आहे. **(४)** मिळकतीचे निरीक्षण आणि इतर तपशिलाकरिता इच्छुक खरेदीदार **टेलिफोन क्र. ०२५१-२२०३२२२, सेल क्र. ९३२५०५४२५२** वर संपर्क करू शकतात. **(५)** मिळकत/ती ''जे आहे जेथे आहे'' , ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येतील. **(६)** मोहोरबंद निविदा याद्वारे अधिसूचित केल्यानुसार निविदा-नि-लिलाव विक्रीच्या तारखेस **दु. १.०० वा.** इच्छुक बोलीदारांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. विक्री बंद निविदेच्या मागाने होणार असली तरीही प्राधिकृत अधिकारी त्यांच्या स्वतःच्या निर्देशाने निविदा लिलाव प्रक्रिया बंद होतेवेळी प्राप्त एकापेक्षा उच्चतम बोलीचा प्रस्ताव देण्यास इच्छुक बोलीदारांच्या दरम्यान खुला लिलाव करतील आणि त्यानंतर उच्चतम बोली करणाऱ्या व्यक्तीला विक्री निश्चित करण्यात येईल. तथापि, विक्री, सिटी युनियन बँक लिमिटेडच्या निश्चितीच्या अधीन राहील. **(७)** यशस्वी बोलीदाराने विक्री पूर्ण झाल्यानंतर **त्वरित** विक्री रकमेच्या **२५% (भरलेली इअर धरून)** आणि **७५%** ची उर्वरित रक्कम विक्री निश्चितीच्या तारखेपासून **१५ दिवसांत** जमा करणे आवश्यक आहे, कसूरवार ठरल्यास अगोदर जमा केलेली **२५%** रक्कम जप्त करण्यात येईल. **(८)** विक्री प्रमाणपत्र हे येथील विहित कालावधीत संपूर्ण विक्री मोबदला प्राप्त झाल्यानंतर फक्त यशस्वी खरेदीदाराच्या नावे प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यात येईल. **(९)** यशस्वी खरेदीदाराने कायद्यानुसार प्रयोज्य मुद्रांक शुल्क, नोंदणी प्रभार इ. असे अभिहस्तांतरणाकरिता देय प्रभार/शुल्क भरायचे आहेत. **(१०)** यशस्वी बोलीदाराने काही असल्यास सांविधिक थकबाकी (कायदेशीर घराचा कर, वीज प्रभार आणि अन्य थकबाकी), टीडीएस, जीएसटी काही असल्यास, शासन, शासकीय उपक्रम, स्थानिक मंडळाची थकबाकी भरायची आहे. **(११)** प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे कोणतेही कारण न देता बोली स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा विक्री पुढे ढकलणे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार राहतील.

ठिकाण : कुंबकोणम, दिनांक : २५-०२-२०२२ — **प्राधिकृत आधिकारी**

नोंद. कार्यालय : १४९, टी.एस.आर. (बीग) स्ट्रीट, कंबकोणम, थनजवुर जिल्हा, तामिळनाडू - ६१२ ००१, **सीआयएन -** एल६५११०टीएन१९०४पीएलसी००१२८७
टेलिफोन क्र. ०४३५-२४०२३२२, **फॅक्स :** ०४३५-२४३१७४६,
वेबसाईट : www.cityunionbank.com

जाहीर नोटीस

तमाम जनतेस हया जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, गांव मौजे चिखलडोंगरे, तालुका बसई, येथिल १. स. नं. १५४, क्षेत्र ०-५०-०, पो.ख. ०-००-५०, २. स.नं. १५५, क्षेत्र ०-७१-९, पो.ख. ०-०२-८ या वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी १.पांडुरंग लक्ष्मण म्हात्रे, २.महेश दत्तात्रेय म्हात्रे, ३.सदानंद दत्तात्रेय म्हात्रे, ४.हरेश्वर दत्तात्रेय म्हात्रे, ५.सुदाम दत्तात्रेय पाटील, ६.यशवंत दत्तात्रेय पाटील, ७.निर्मला धनेश म्हात्रे, ८.बेबीबाई महेश पाटील, यांनी त्यांचे मालकिची १/३ हिश्श्याची जमिन मिळकत माझे अशिलास कायम विकण्याचे ठरविले आहे, तरी सदर व्यवहारांस कोणाचीही हरकत अथवा, कुंळागर, विश्वस्त, दावा, वारसा, ताबा, इजमेंटच्या अन्य वारसांचा हक्क हितसंबंध असल्यास तशी लेखी हरकत माझेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या कागदपत्रांसहीत नोंदवावी. उशीरा अथवा कागदपत्रांविना येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, हयाची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०२/२०२२. — **सही/-**
ॲड. श्री. दिपेश जयवंत पाटील.
पत्ता : ए/०६, सरस्वती बाग-१ को.ऑ.हौ.सो., जुने विवा कॉलेज रोड, विरार (प), ता. वसई, जि. पालघर.

जाहीर सूचना

सामान्य नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लि. यांनी खाली नमूद वाहनांच्या संदर्भात लिलाव आयोजित केला आहे.

१) **आयशर_व्हीईसीव्हीईपीआरओ५०३५ डीएन०९आर९०७१ निर्मिती वर्ष-२०१८ कमीत कमी राखीव किंमत - ६३८७७७/-**
२) **आयशर व्हीई१०७५एफबीपी एमएच०४सीपी८४५१ निर्मिती वर्ष-२०१८ कमीत कमी राखीव किंमत - ७४१३१५/-**
३) **आयशर_व्हीईसीव्हीपीआरओ_२११० एमएच०४केयु५२३२ निर्मिती वर्ष-२०२१ कमीत कमी राखीव किंमत - १३०५०००/-**
४) **आयशर पीआरओ १११०एक्सपी एमएच४६बीएफ१६२० निर्मिती वर्ष-२०१८ कमीत कमी राखीव किंमत - ७६५७८०/-**
५) **टाटामोटर्सटीएलपीटी११०९एफबी एमएच०८एच२०६८ निर्मिती वर्ष-२०१२ कमीत कमी राखीव किंमत - २२५०००/-**
६) **महिंद्रा टुरिस्ट बस एमएच४६एएच०७१३ निर्मिती वर्ष - २०१६ कमीत कमी राखीव किंमत - ४१९३९७/-**

जे मे. कोटक महिंद्रा बँकेकडे जंगमगहाण आहे ते ''जे आहे जसे आहे'' या तत्वावर विक्री करण्यात येणार आहे.
इच्छुक पक्षकारांनी त्यांचे दरपत्र (ऑनलाईन/ऑफलाईन) सदर वृत्तपत्र प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत म्हणजेच १३.०३.२०२२ रोजी किंवा पूर्वी
शाखा कार्यालय: कोटक महिंद्रा बँक लि., १६६/१६, ८वा मजला, अदमास प्लाझा सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०९८ येथे सादर करावेत किंवा

संपर्क: मयुर चव्हाण
कोटक महिंद्रा बँक लि.
संपर्क/ ०२२-६६३८३४६६, इमेल: **mayur.chavan1@kotak.com**

NRB BEARINGS

एनआरबी बेअरिंग्ज लिमिटेड

सीआयएन : एल२९१३०एमएच१९६५पीएलसी०१३२५१
नों. कार्यालय : धन्गुर, १५, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१, **दू :** +९१ २२ २२६६४१६०/४५७०,
फॅक्स : +९१ २२ २२६६०४१२, **वेबसाईट :** www.nrbbearings.com, **ईमेल :** investorcare@nrbbearings.co.in

टपाल मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (अधिनियम) च्या कलम ११० सहवाचता कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २२ आणि असल्यास अन्य कोणत्याही प्रयोज्यतरतुदी आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ ला अनुसरून, विशेष ठराव म्हणून संमत करण्याचा प्रस्ताव असलेल्या १२ नोव्हेंबर, २०२१ दिनांकीत टपाल मतदानाच्या सूचनेत मांडलेल्या ठरावांच्या संबंधात इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानासाह टपाल मतदानाच्या माध्यमातून सभासदांची मंजुरी कंपनीला हवी आहे. कुणाला टपाल मतदान सूचना पाठवली त्या सभासदांची गणना करण्यासाठी कट-ऑफ डेट आहे शुक्रवार, ११ फेब्रुवारी, २०२२ खालील कामकाजाच्या मंजुरीसाठी ज्यांनी त्यांचे ई-मेल ॲड्रेस नोंदवले त्या सभासदांना ई-मेलने टपाल मतदान सूचना आणि टपाल मतपत्रिका पाठवली आहे आणि अन्य सर्व सभासदांना त्यांच्या पत्त्यावर संमत माध्यमातून टपाल मतदान सूचनेची प्रत्यक्ष प्रत, टपाल मतपत्रिका आणि स्व-पत्त्याच्या आगाऊ टपाल खर्च प्रदान केलेले पाकिट पाठवले आहे.

बाब क्र.	तपशील
१.	कार्यकारी संचालक म्हणून पदनिर्देशित असलेले एक पूर्ण वेळ संचालक म्हणून श्री. सतीश रंगानी (डीआयएन : ००२०९०६९) यांनी वयाची ७० वर्षे पूर्ण केली यांच्या २४ जानेवारी, २०२२ पासून २ (दोन) वर्षाच्या मुदतीसाठी पुनर्नियुक्तीसाठी शेड्युल V सहवाचत कलम १९६, १९७ व २०३ अन्वये विशेष ठराव.

२५ फेब्रुवारी, २०२२ रोजी टपाल मतदान सूचना पाठवणे कंपनीने पूर्ण केलं.
कंपनीने सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याची सुविधा पुरवली आहे आणि टपाल मतदानाच्या सूचनेत मांडलेले कामकाज सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ने पुरवलेल्या सेवेमार्फत करता येईल. ई-व्होटींग प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून संचालक मंडळाने श्री. उपेंद्र शुक्ला, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी यांची नियुक्ती केली आहे.
ई-व्होटींगचा कालावधी मंगळवार, १ मार्च, २०२२ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) सुरु होईल आणि बुधवार, ३० मार्च, २०२२ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ३० मार्च, २०२२ नंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही टपाल मतपत्रिका वैध नसतील आणि ३० मार्च २०२१ नंतर टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याची अनुमती नसेल.
टपाल मतदान सूचना, टपाल मतपत्रिका आणि ई-व्होटींग साठी निर्देश सीडीएसएल ची वेबसाईट : https://www.evotingindia.com वर आणि कंपनीची वेबसाईट www.nrbbearings.com वर सुद्धा उपलब्ध असेल. ज्या सभासदांना सूचना मिळाली नसेल ते ती वरील वेबसाईटवरून डाऊनलोड करू शकतात किंवा investorcare@nrbbearings.co.in वर मेल पाठवून कंपनी सेक्रेटरींकडे लेखी त्यांच्या प्रतीसाठी विनंती करू शकतात.
टपाल मतदानाचा निकाल कंपनीकडून शुक्रवार, १ एप्रिल, २०२२ रोजी घोषित केला जाईल आणि निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात लावला जाईल कंपनीचे शेअर्स जेथे सूचिबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजेसना कळवला जाईल आणि तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासह कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.nrbbearings.com वर प्रदर्शित केला जाईल.
टपाल मतदानाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाशी संबंधित कोणत्याही तक्रारी/चौकशा/स्पष्टीकरणासाठी सभासदांनी कृपया रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंटसशी संपर्क साधावा.
युनिव्हर्सल कॅपिटल सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड
(लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ची १००% उपकंपनी)
युनिट : एनआरबी बेअरिंग्ज लिमिटेड
पत्ता : सी-१०१, १ ला मजला, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३.
ईमेल : info@unisec.in, दूरध्वनी : ०२२ २८३६६६२०, ०२२ २८२०७२०३-०५

संचालक मंडळाच्या आदेशाने
एनआरबी बेअरिंग्ज लिमिटेड साठी

दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२२ — **श्रुती जोशी**
ठिकाण : मुंबई — **कंपनी सेक्रेटरी**

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९, भारत.
शाखा कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, २०३, प्लॉट क्र. २, के.टी. एम्पायर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर, नवघर, वसई (प.)-४०१२०२.

[नियम ८ (६) साठी परंतुके पहा]

स्थावर मत्तेच्या विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) साठी परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णन केलेल्या स्थावर मिळकत ही तारण धनकोकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष कब्जा आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती येथे खालील दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार ''जे आहे जेथे आहे,'' ''जे आहे जसे आहे आणि जे काही आहे तेथे आहे'' तत्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार यांचे नाव/ कर्ज खाते क्र.	काही असल्यास ज्ञात भारांसह तारण मत्तेचा तपशील	थकीत रक्कम	राखीव किंमत / इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	अमोल साहेबराव उजागरे (कर्जदार) सुमन शंकर उजागरे (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एनएचएमयुएम००००१२८०९५३	फ्लॅट क्र. ४१३, ४ था मजला, बी विंग, श्री अष्टविनायक को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, साईनाथ पेट्रोल पंप जवळ, विरार पश्चिम, तालुका वसई, जिल्हा पालघर-४०१३०५	रु. १९,३१,८३४/- (२३ फेब्रु. २०२२ रोजीस)	रु. १७,१२,०००/- / रु. १,७१,२००/-	२५ मार्च, २०२२ स. ११.०० ते दु. ०३.००	२९ मार्च, २०२२ दु. ०२.०० ते दु. ०.३००

ऑनलाईन लिलाव हा आमची लिलाव एजन्सी ऑक्शन टायगर यांची वेबसाईट **(युआरएल लिंक-https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/)** वर करण्यात येईल. गहाणवटदार/नोटीसी यांना **२८ मार्च, २०२२ रोजी सायं. ५.०० वा.** पूर्वी एकूण थकबाकीसह त्यावरील पुढील व्याज चुकते करण्याची अंतिम संधी देण्यात येते, अन्यथा सदर तारण मत्ता वेळापत्रकाप्रमाणे विकण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांना **२८ मार्च, २०२२ रोजी** किंवा पूर्वी सायं. **०५.०० वा.** पूर्वी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, २०३, प्लॉट क्र. २, के.टी. एम्पायर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर, नवघर, वसई (प.)-४०१२०२** आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डिडि) ने (रकाना ई मध्ये उल्लेखित) सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी की, संभाव्य बोलीदारांना वरील नमुद वेळेनुसार त्यांचा प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास **२८ मार्च, २०२२ रोजी** किंवा पूर्वी सायं. **०५.०० वा.** पूर्वी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, २०३, प्लॉट क्र. २, के.टी. एम्पायर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर, नवघर, वसई (प.)-४०१२०२** येथे निविदा दस्तावेजांची सही केलेली प्रत सादर करु शकतात. इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट (डीडी) हा **वसई** येथे देय **''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-ऑक्शन''** च्या नावे राष्ट्रियकृत/शेड्युल बँकेवरील असणे आवश्यक आहे.
निरिक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदाच्या सादरीकण करिता पुढील कुठल्याही स्पष्टीकरण करिता कृपया **७०२१०७२८६९ आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** ला संपर्क करावा.
कोणतेही कारण न देता कोणातीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांनी राखून ठेवले आहेत.
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया आयसीआयसीआय बँकची वेबसाईट **https://www.icicihfc.com/** यावर भेट द्या.

दिनांक: २७ फेब्रुवारी, २०२२ — **प्राधिकृत अधि कारी**
ठिकाण: वसई — **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

The spirit of Mumbai is now 93 years old!

THE FREE PRESS JOURNAL
www.freepressjournal.in

Nippon india Mutual Fund

Wealth sets you free
MUTUAL FUNDS Sahi Hai

Nippon Life India Asset Management Limited

(CIN - L65910MH1995PLC220793)
Registered Office: 4th Floor, Tower A, Peninsula Business Park, Ganapatrao Kadam Marg, Lower Parel (W), Mumbai - 400 013. Tel No. +91 022 6808 7000
Fax No. +91 022 6808 7097 • mf.nipponindiaim.com

Record Date March 04, 2022

NOTICE NO. 117

Notice is hereby given that the Trustee of Nippon India Mutual Fund (NIMF) has approved the following Distribution on the face value of Rs. 10/- per unit under Income Distribution cum capital withdrawal (IDCW) option of the undernoted scheme of NIMF, with March 04, 2022 as the record date:

Name of the Scheme(s)	Amount of Distribution (₹ per unit)*	NAV as on February 25, 2022 (₹ per unit)
Nippon India Large Cap Fund - IDCW Option	1.7500	20.3284
Nippon India Large Cap Fund - Direct Plan - IDCW Option		27.6854

*Income distribution will be done, net of tax deducted at source, as applicable.

Pursuant to payment of dividend/IDCW, the NAV of the Scheme will fall to the extent of payout, and statutory levy, if any. The IDCW payout will be to the extent of above mentioned Distribution amount per unit or to the extent of available distributable surplus, as on the Record Date mentioned above, whichever is lower.

For units in demat form : IDCW will be paid to those Unitholders/Beneficial Owners whose names appear in the statement of beneficial owners maintained by the Depositories under the IDCW Plan/Option of the Scheme as on record date.

All unit holders under the IDCW Plan/Option of the above mentioned scheme, whose names appear on the register of unit holders on the aforesaid record date, will be entitled to receive the IDCW.

For Nippon Life India Asset Management Limited
(Asset Management Company for Nippon India Mutual Fund)
Sd/-
Authorised Signatory

Mumbai
February 26, 2022

Make even idle money work! Invest in Mutual Funds

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

भारत सरकार,
वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II,
३रा मजला, एमटीएनएल भवन, स्ट्रॅन्ड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा मुंबई- ४००००५.

स्थावर मिळकतीच्या जप्तीचे वॉरंट
वसुली कार्यवाही क्र. १२ सन २०१५
परि क्र. २४
पुढील दिनांक:-२१/०३/२०२२
एचडीएफसी बँक लि. ....प्रमाणपत्र धारक
विरूध्द
अनिल कुमार झा ....प्रमाणपत्र ऋणको

ज्याअर्थी **अनिल कुमार झा** सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी काढलेल्या ओ.ए. **क्र. १५६ सन २०१३** मधील **वसुली प्रमाणपत्र क्र. १२ सन २०१५** च्या संदर्भातील **रु. १३,५२,१६८/- (रुपये तेरा लाख बावन्न हजार एकशे अडुसष्ट मात्र)** वासह व्याज आणि परिव्यय आणि त्यावरील व्याज ही रक्कम चुकती करण्यात कसूरवार ठरले आहात.
तुम्हाला याद्वारे कोणत्याही बाबतीत खालील नमूद मिळकतीसह व्यवहार किंवा कब्जा, प्रभारासह हस्तांतर, अन्यसंक्रमण, तिसऱ्या पक्षाचा हितसंबंध निर्माण करणे, वाटप करण्यापासून पुढील आदेशापर्यंत प्रतिबंध आणि मनाई करण्यात येत आहे आणि की सर्व व्यक्तींना असे हस्तांतर, अन्यसंक्रमण, क